# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

**विषय — पीएच.डी अभ्यासक्रमाच्या प्रवेशामध्ये ठेवावयाच्या आरक्षणाबाबत.**

विद्यापीठ शैक्षणिक विभाग, सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व संशोधन संस्था यांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, पीएच.डी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देताना आरक्षणासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्वे व शासनाच्या आरक्षणविषयक धोरणाची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. शैक्षणिक प्रवेशामध्ये मागासवर्गीयांसाठी असलेले आरक्षणविषयक धोरण राबविण्यासंदर्भात महाविद्यालये/संस्थेस वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

अ) प्रवेश देताना खाली नमूद केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेश देण्यात यावेत.

| | |
|---|---|
| सर्वसाधारण (खुले) | ५० % |
| अनुसूचित जाती | १३ % |
| अनुसूचित जमाती | ७ % |
| विमुक्त जाती (अ) | ३ % |
| भटक्या जमाती (ब) | २.५ % |
| भटक्या जमाती (क) | ३.५ % |
| भटक्या जमाती (ड) | २ % |
| इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ % |

ब) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील तरतूदी, विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्वे व शासनाच्या आदेशानुसार अपंग प्रवर्गासाठी ३% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

क) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ %पर्यंत विशेष मागासप्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

उपरोक्त आरक्षण हे विभागामध्ये अभ्यासक्रमनिहाय असेल. शैक्षणिक विभागांतर्गत येणा—या बिगर राखीव जागा या प्रथमत: भरण्यात याव्यात. यामध्ये गुणवत्तेनुसार असणा—या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा देखील समावेश अराखीव उमेदवार म्हणून असेल. या विद्यार्थ्यांचा समावेश आरक्षणामध्ये करण्यात येवू नये, उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात.

शैक्षणिक विभागात प्रवेश देताना एखादया प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांच्या इतर गटातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यामधून शासन निर्णयानुसार अंतर्गत बदलाने उमेदवारांना प्रवेश देवून आरक्षण पूर्ण करण्यात यावे.

शासनाच्या आरक्षण धोरणानुसार क्रिमीलेअरचे आदेश महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, विजाभज आणि विमाप्र प्रवर्गासाठी लागू राहतील त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांना आरक्षणाच्या कोणत्याही सवलती/फायदे प्राप्त होणार नाहीत.

प्रवेश समितीवर मागासवर्गीय शिक्षकास मागासवर्गीय प्रतिनिधी म्हणून बोलाविण्यात यावे. मागासवर्गीय प्रतिनिधींची यादी यापूर्वीच सर्व विभागांना पाठविण्यात आलेली आहे.

प्रवेश प्रक्रियेनंतर झालेल्या प्रवेशाची माहिती या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

गणेशखिंड, पुणे ४११००७
संदर्भ — आरक्षण/११/४७५
दिनांक — २८/४/२०११

28/4/2011
सहायक कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

प्रत :—

१. **मा. विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७.**
२. **मा.प्राचार्य/मा.संचालक, संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/संशोधन संस्था.**